# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.**
**शिबीर दि. २४/१०/२०१८ ते ३१/१०/२०१८**

शासनाने ''राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना'' व ''डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना'' तसेच मागासवर्ग प्रवर्गासाठीच्या शासनाच्या विविध शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजना https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

वरील योजनेकरीता विद्यापीठ विभागातील पात्र विद्यार्थ्यांनी शासन संकेतस्थळावर अर्ज भरलेले आहेत. तथापी, विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रृटी आढळून आल्याने सदर अर्ज शासनाकडे पुढे पाठविता येत नाही अशा विद्यार्थ्यांच्या अर्जातील त्रृटींची पुर्तता तसेच ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज केलेले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक प्रवेश विभाग (शिष्यवृत्ती कक्ष) येथे दि. २४/१०/२०१८ ते ३१/१०/२०१८ या कालावधीत शिबीर आयोजित केलेले आहे.

| अ. क्र. | विद्याशाखा व विभाग | दिनांक | | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा — सर्व विभाग | २४/१०/२०१८ | २५/१०/२०१८ | स. ११ ते १.३०<br>दु. ३ ते ५.३० |
| २ | मानवविज्ञान विद्याशाखा — सर्व विभाग | २६/१०/२०१८ ते २७/१०/२०१८ व २९/१०/२०१८ | | स. ११ ते १.३०<br>दु. ३ ते ५.३० |
| ३ | वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा | ३०/१०/२०१८ | | स. ११ ते १.३०<br>दु. ३ ते ५.३० |
| ४ | आंतर—विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | ३१/१०/२०१८ | | स. ११ ते १.३०<br>दु. ३ ते ५.३० |

तरी, वरील योजनांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत तसेच ज्यांना अर्ज करावयाचे आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रासह वर उल्लेख केलेल्या दिनांक व वेळेनुसार उपस्थित रहावे.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे — ७
संदर्भ : शै. प्रवेश/४३८८
दिनांक : २२/१०/२०१८

प्रत:

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपल्या विभागातील ज्या पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेले आहेत तसेच ज्यांना अर्ज करावयाचे आहेत अशा विद्यार्थ्यांना वरील तारीख व वेळेनुसार शैक्षणिक प्रवेश विभाग (शिष्यवृत्ती कक्ष) येथे उपस्थित राहण्याबाबत सुचना देण्यात याव्यात.